11 NOV 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# संशोधनातून देश घडविण्याचे काम तरुणांनी करावे

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : डी.वाय.पाटील विद्यापीठात सुक्ष्मतंत्रज्ञान परिषदेस प्रारंभ : २५० संशोधकांची उपस्थिती

वार्ताहर
कसबा बावडा

तरूणांनी वेगवेगळ्या विषयावर संशोधन करून देश घडविण्याचे काम करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

डी. वाय. पाटील विद्यापीठामध्ये आयोजित सूक्ष्मतंत्रज्ञान परिषदेत प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शनिवार ११ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या परिषदेच्या अध्यक्षस्थानी डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश बेहेरे होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, संयोजक डॉ. सी. डी. लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती

प्रारंभी प्रा. रूडॉल्फ होल्जे व प्रो. टी. पी. गुजर (शास्त्रज्ञ जर्मनी), प्रा. वेन पिंग पेंग (शास्त्रज्ञ तैवान), प्रो. जे. जे. शिम व जे. एच. किम (शास्त्रज्ञ साऊथ कोरीया), डॉ. दीपक दुबल (शास्त्रज्ञ ऑस्ट्रेलिया), डॉ. डी. एस. ढवळे (शास्त्रज्ञ कतार), डॉ. झनकारे (शास्त्रज्ञ मुंबई), प्रो. एस. के. जैन (शास्त्रज्ञ), डॉ. दिवान प्रकाश (शास्त्रज्ञ हैद्राबाद), डॉ. अंजली शिरास व डॉ. प्रदीप महाजन (शास्त्रज्ञ पुणे) यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून परिषदेला सुरूवात झाली.



कोल्हापूर : डी.वाय. पाटील विद्यापीठात सूक्ष्मतंत्रज्ञान परिषदेचे उद्घाटन झाले परिषदेस २५० संशोधक उपस्थित आहेत.

कुलगुरू डॉ. प्रकाश बेहेरे यांनी इंटरडिसिप्लीनरी संशोधनाबद्दल माहिती दिली. संयोजक डॉ. सी. डी. लोखंडे व डॉ. अरविंद गुलबाके यांनी स्वागत केले.

प्रो. रूडॉल्फ होल्जे यांनी डॉ. सी. डी. लोखंडे यांच्या संशोधन क्षेत्रातील दीर्घकालीन व दर्जेदार केलेल्या संशोधनाबद्दल त्यांच्या साठीनिमित्त त्यांना समर्पित केलेले 'जर्मन ऑफ सॉलीड स्टेट इलेक्ट्रोकेमिस्ट्री" तसेच यानिमित्त चार सामंजस्य करारही केले. ज्यातील तीन आंतरराष्ट्रीय व एक राष्ट्रीय सामंजस्य करार आहेत.

यावेळी प्रो. रूडॉल्फ होल्जे यांनी आपल्या भाषणात मॅग्नेशियमचा सुपर कपॅसिटर याविषयी संपूर्ण संशोधनाची माहिती व युवा शास्त्रज्ञांना त्याचा होणरा उपयोग विषद केला.

डॉ. भावीन झनकारे यांनी, इमेजद्वारे कॅन्सरवरील निदान व आधुनिक उपचारपध्दती कशी असते व त्याचा रूग्णांना कसा फायदा होईल हे विषद केले.

प्रो. जे. जे. शिम यांनी आपल्या संशोधनातील सुपर कपॅसिटर व फोटोकॅटॅलिस्ट याचे महत्त्व युवा शास्त्रज्ञांना दिले.

प्रो. जे. एच. कीम यांनी एफिसेन्सी ऑफ सोलार सेल याविषयी परिषदेमध्ये आपले विचार मांडले. शिवाजी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. एच. एम. पठाण यांनी, त्यांनी केलेल्या सोलार सेल संशोधनावर परिषदेमध्ये आपले विचार व्यक्त केले.

या परिषदेला २५० हून अधिक संशोधक उपस्थित असून, अनेकांनी आपले पोस्टर प्रदर्शित केले. ही परिषद ११ नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे. त्यामध्ये विविध देशांतून आलेले शास्त्रज्ञ त्यांच्या संशोधनाबद्दलचे विचार व्यक्त करणार आहेत. आणि त्याचा फायदा सर्व पीएच.डी. विद्यार्थी व शास्त्रज्ञ यांना होणार आहे.

11 NOV 2017
पुण्यनगरी

# उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात कौशल्य विकासाची गरज

## डॉ. विलास नांदवडेकर : विद्यापीठात 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'चे उद्घाटन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात कौशल्य विकास व रोजगाराभिमुख ज्ञानरचनावादाच्या निर्मितीची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठात इन्फोसिसच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या आठ दिवसीय 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'चे उद्घाटन शुक्रवारी सकाळी डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. रसायनशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास इन्फोसिसच्या सीएसआर व डायव्हर्सिटी इनिशिएटिव्हज व्यवस्थापक रिना रवी आणि ट्रेनर लीना अमृते प्रमुख उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात इन्फोसिसतर्फे आयोजित 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'च्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता विकास डोळ्यांसमोर ठेवून ज्ञानरचनावाद आकाराला आला, त्याच धर्तीवर उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही सृजनशीलता विकास, आऊटकम बेस्ड लर्निंग, कौशल्य विकास व उपयोजित ज्ञान देऊन हातांना काम प्रदान करणाऱ्या शिक्षणाची आणि ते देणाऱ्या शिक्षकांची गरज आहे. केंद्र सरकारने अशा प्रकारच्या ३५० हून अधिक विशेष अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी नव्याने रुजू होणाऱ्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. आजचा विद्यार्थी हा माहितीसंपन्न आहे. तथापि, त्याच्याकडील माहितीचे ज्ञानात रूपांतर करून त्याचा पद्धतशीरपणे वापर करण्याची क्लृप्ती या शिक्षकांनी शिकवणे नव्या व्यवस्थेत अभिप्रेत आहे. या उपक्रमाच्या आयोजनामागील हेतू अधिक स्पष्ट करून सांगताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, आपण निवडक शिक्षकांनी या प्रशिक्षणादरम्यान घेतलेल्या प्रशिक्षणाचा लाभ आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला पाहिजे. संशोधनाची गरज, सृजनशीलता वृद्धी, अभिनव संकल्पना विकास व सहभाग, रोजगार व रोजगारक्षमता निर्मिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एक उत्तम नागरिक म्हणून विद्यार्थ्यांचा विकास करण्याची जबाबदारी आपणा सर्व शिक्षकांवर आहे.

व्यक्तिगत विकास करत असतानाच संस्थेच्या हिताचा विचारही तितकाच महत्त्वाचा आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. उपक्रमात विविध महाविद्यालयांतील ४५ शिक्षक सहभागी झाले.

उपक्रमाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. इन्फोसिसच्या रिना रवी यांनी सुधा मूर्ती यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या 'ट्रेन द ट्रेनर' उपक्रमाचे समाजाच्या तसेच शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व विशद केले. सचिन जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2017
सकाळ

# डॉ. आंबेडकर अखेरपर्यंत विद्यार्थीच : उत्तम कांबळे



ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे

कोल्हापूर, ता. १० : "डॉ. आंबेडकर हे आयुष्यभर विद्यार्थी म्हणूनच राहिले. ज्ञानकण संचयाचे काम त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत केले", असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवा-पूर्व मार्गदर्शन केंद्रात आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शैक्षणिक परिवर्तन यावर विशेष व्याख्यान झाले. श्री. कांबळे म्हणाले, "डॉ. बाबासाहेबांना शिक्षणाचे महत्त्व, प्रयोजन खूप लवकर लक्षात आले; कारण या देशातील सामाजिक परिस्थिती आणि व्यवस्थेविषयी ते दररोज एका नित्य नव्या प्रश्नाला सामोरे जात होते. त्यातून त्यांना आपल्याला माणूस म्हणून समान वागणूक का दिली जात नाही, हा प्रश्न छळू लागला. त्यातून वडिलांसोबत कबीराचे दोहे गाताना किंवा केळुस्कर गुरूजींनी भेट दिलेल्या बुद्ध चरित्राची पारायणे करताना त्यांना शिक्षणाचे प्रयोजन सापडले, ते म्हणजे मला समाज बदलायचा आहे, हे होय. मी माणूस आहे. मला माझी सच्ची ओळख निर्माण करायची आहे, मिळवायची आहे, हा बाबासाहेबांच्या अथक संघर्षाचा महत्त्वाचा मुद्दा राहिला. त्यातूनच त्यांनी शिक्षणाचा असा काही ध्यास घेतला की, अल्पावधीत या देशातील ते सर्वाधिक उच्चशिक्षित व्यक्ती बनले. परदेशातील खडतर परिस्थितीत एकवेळ उपाशी राहून त्यांनी जी ज्ञानोपासना केली, त्याला इतिहासात तोड नाही. जो विषय अभ्यासायला घेतला तो ते संपूर्णतया आत्मसात करीत असत. त्या विषयाशी पूर्णतः तादात्म्य पावत असत. त्यामुळे बाबासाहेबांच्या शिक्षणाचा या देशातील अडाणी, निरक्षर दलित समाजमनावर अत्यंत दूरगामी परिणाम झाले. शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबले. बाबासाहेबांनी केलेले हे महत्त्वाचे शैक्षणिक परिवर्तन कार्य होते."

ते म्हणाले, "स्पर्धा परीक्षा किंवा कोणताही अभ्यास करीत असताना आपले पर्यावरण समजून घेणे ही अत्यंत महत्त्वाची पूर्वअट आहे. आपण आपल्या भोवतालच्या पर्यावरणाला गृहित धरतो किंवा त्याच्याशी संबंध नाकारतो, तिथेच मोठी चूक करतो. या पर्यावरणाचे भान आणि जाण आपल्यात विकसित झाली पाहिजे. त्यातून प्रश्न विचारण्याची ताकद निर्माण झाली पाहिजे. प्रश्न विचारणे हे व्यक्तीगत ज्ञानपिपासू वृत्तीचे आणि जागृतीचे महत्त्वाचे लक्षण आहे." विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. सचिन कदम यांनी आभार मानले.

## बाबासाहेब जागा करा!

श्री. कांबळे म्हणाले, "मी शाळेत जायला तयार नव्हतो. पण, माझी आजी मला बदडतच शाळेत घेऊन गेली. तिथं मास्तरांसमोर मला उभा करून म्हणाली, मास्तर, याला मरेस्तोवर मारा; खरं याच्यातला बाबासाहेब जागा करा! ही बाबासाहेबांच्या शैक्षणिक परिवर्तनाची किमया होती. शिक्षणापासून वंचित म्हातारीमध्येही आपल्या नातवामध्ये दडलेल्या बाबासाहेबाला जागृत करण्याची तीव्र इच्छा प्रदीप्त झाली होती, हे बाबासाहेबांचे यश होते. या महामानवाच्या शाळा प्रवेशाचा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा होण्याला म्हणूनच आगळे महत्त्व आहे."

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2017
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, अॅस्टर आधार हॉस्पिटलतर्फे विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांना माहिती देताना डॉ. अमोल कोडोलीकर.

# जीवन संजीवनीचे महत्त्व अवगत असणे गरजेचे

## डॉ. कोडोलीकर : विद्यापीठ, 'अॅस्टर'तर्फे कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : ''हृदयक्रिया अचानक बंद पडल्यानंतर त्यास जीवनदान देण्यासाठी सुरुवातीचे काही सेकंद सुवर्णक्षण ठरु शकतात. यासाठी जगातील प्रत्येक जबाबदार नागरिकास जीवन संजीवनीचे महत्व अवगत असणे गरजेचे आहे'', असे मत अॅस्टर आधारचे संचालक, भूलतज्ज्ञ डॉ. अमोल कोडोलीकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, अॅस्टर आधार हॉस्पिटलतर्फे विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांत आरोग्य विषयक जनजागृती निर्माण करण्यासाठी बेसिक लाईफ सपोर्ट ही आपत्कालीन समयी 'गोल्डन अवर'मध्ये वापरली जाणारी प्रथमोपचाराची पद्धत कशी असते, व आपत्कालीन परिस्थितीत उपयोग करुन एखाद्याचे प्राण वाचवता येऊ शकतात, हे प्रात्यक्षिकांसह दाखविण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कार्यशाळा झाली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. कोडोलीकर म्हणाले, ''आज जगभरात प्रती ९० सेकंदात एका माणसास हृदयविकाराचा झटका येत आहे. यामध्ये साठ ते सत्तर टक्के लोक हृदयक्रिया बंद पडल्यामुळे रुग्णालयापर्यंत पोहचू शकत नाही. त्यामुळेच जीवन संजीवनी प्रक्रीयेचा अवलंब करण्याचा प्रयत्न करावा. सावित्री आसन, सावित्री मुद्रेमुळे रुग्णांचे प्राण वाचू शकतात. एखाद्याची हृदयक्रिया बंद पडल्यानंतर त्या रुग्णाला भोवळ येते. या सुरुवातीच्या काळात पहिली तीस सेकंद ते पाच मिनिटे दरम्यान त्या व्यक्तीच्या खांद्यास हलवून जागृत करण्याचा प्रयत्न करावा. जागृत न झाल्यास त्वरीत श्वास तपासावा. प्रतिसाद देत नाही म्हणजे हृदयक्रिया बंद पडली आहे, असे समजावे. यावेळी जीवन संजीवनीचा वापर करावा. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळामध्ये एईडी मशीनच्या वापराने अनेकांचे प्राण वाचू शकतात. '' जीवनसंजीवनीबाबत माहिती देणारे स्टिकर वितरीत केले.

अॅस्टरच्या प्रशासकीय अधिकारी सौ. आयेशा राउत यांनी प्रास्ताविक केले. डॉ. चाडीलकुमार यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. ए. रानडे यांनी आभार मानले. अॅस्टरचे कार्यकारी संचालक डॉ. उल्हास दामले, मुख्य व्यवस्थापक शिवानंद अपराज, डॉ. आर. आर. देशपांडे, डॉ. राहूल ढाणे, डॉ. टी. के. पाटील उपस्थित होते.



11 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीधर गटामध्ये फेरबदलाची चिन्हे

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीतही शह-काटशहाचे राजकारण सुरू आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना एक गट आणि पॅनेल घोषणा करताना दुसरा गट असा प्रकार घडला आहे. शिवाय कुलगुरू आणि कुलपती नियुक्त सदस्यांत वर्णी लागण्याच्या शक्यतेने प्रत्यक्ष निवडणुकीतून माघार घेतली आहे. पदवीधर गटात येत्या काही दिवसांत आणखी काही फेरबदलाची चिन्हे आहेत. या गटात वर्चस्व राखण्यासाठी विकास आघाडीने मोर्चेबांधणी केली आहे, तर विद्यार्थी कृती समिती व अपक्षांच्या ताकदीचा कस लागणार आहे.

'नोंदणीकृत पदवीधर'मध्ये दहा जागा असून त्यापैकी एसटी प्रवर्ग गटातील एक जागा बिनविरोध झाली. उर्वरित नऊ जागांसाठी मोठी चुरस आहे. या गटात मतदारसंख्या चौदा हजारांहून अधिक आहे. शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी आणि विद्यापीठ विकास मंच हे एकत्रितपणे नऊ जागा लढवित आहेत. त्यांच्या विरोधात आजी-माजी विद्यार्थी कृती समिती आहे. विकास आघाडी आणि विकास मंचमध्ये नऊ जागांचे वाटप झाले आहे.

यामध्ये विकास आघाडीला पाच आणि विकास मंचला चार जागा असा फॉर्म्युला ठरला आहे. विकास आघाडी आणि मंचच्या उमेदवारांत मल्लाप्पा चौगुले, प्रा. मधुकर पाटील, संजय जाधव, श्रीनिवास गायकवाड, पंकज मेहता, स्वाती पंडित, अमरसिंह रजपूत, दिनेश जंगम, आरती शिंदे यांचा समावेश आहे. या आघाडीकडून यापूर्वी अमित कुलकर्णी यांची उमेदवारी जाहीर झाली होती. आता अमित कुलकर्णी यांनी नोंदणीकृत पदवीधरमधून माघार घेतली.

### अर्ज एकाकडून, उमेदवारी दुसऱ्या पॅनेलमधून

अमित कुलकर्णी यांनी माघार घेतल्याने विकास आघाडीतील एक जागा रिक्त झाली. त्या जागेवर प्रा. मधुकर पाटील यांना विकास आघाडीतून उमेदवारी मिळाली आहे. तत्पूर्वी प्रा. पाटील यांनी नोंदणीकृत पदवीधर गटासाठी आजी-माजी विद्यार्थी कृती समितीकडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. दुसरीकडे प्रा. पाटील पहिल्यापासूनच विकास आघाडीची उमेदवारीसाठी प्रयत्नशील होते. दरम्यान, डॉ. प्रवीण कोडोलीकर यांनी स्थापन केलेल्या आजी-माजी विद्यार्थी कृती समितीचे पदवीधर गटातील विविध प्रवर्गात सहा उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.



### दोन ठिकाणी थेट, तीन ठिकाणी बहुरंगी

एससी आणि डीटीएनटी प्रवर्गात विकास आघाडी आणि विद्यार्थी कृती समितीत थेट लढत आहे. एससी गटात स्वाती पंडित आणि विश्वास माने तर डीटीएनटी गटात अमरसिंह रजपूत आणि चंद्रशेखर पोरे यांच्यात लढत आहे. पदवीधर गटातून अमित जाधव, अजित पाटील, कमल आनंदा पाटील, देवगोंडा पाटील, नितीन पाटील, सयाजीराव पाटील, संजय राणे, संजय साळोखे, राजगोंडा वळीवडे, शैला बिरंजे, पुरेंद्र गुरव, शाहू काटकर, संजीव कुंभार हे उमेदवारही नशीब आजमावत आहेत. खुला, ओबीसी आणि महिला गटात बहुरंगी लढत आहे.

11 NOV 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एकाच वर्षात 'डबल' पदवी बंद!

## 'यूजीसी'चा निर्णय; विद्यार्थ्यांची गोची; प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पैसे परतीची कार्यवाही

**कोल्हापूर : विजय पाटील**

एकाच शैक्षणिक वर्षात दोन पदव्या घेण्याची विद्यार्थ्यांसाठी असणारी चांगली सुविधा यापुढे बंद झाली आहे. कारण विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) एकाचवर्षी दोन पदवी घेणे हे नियमबाह्य असेल, असे स्पष्ट निर्देश सर्व विद्यापीठांना दिले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांची मात्र गोची झाली आहे. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात प्रवेश घेतलेल्या १८० विद्यार्थ्यांची या निर्णयामुळे अडचण झाली असल्याने त्यांची फी परत देण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

> 'यूजीसी'ने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली जात आहे. विद्यार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये म्हणून दोन पदव्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया बंद करण्यात आली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी प्रवेश घेतले आहेत, अशांनी भरलेली फी परत देण्याची कार्यवाही सुरू आहे.
>
> **– डॉ. डी. टी. शिर्के**, प्र-कुलगुरू

पंधरा वर्षांच्या मुलाने एकाचवेळी चार पदव्या घेतल्याच्या विदेशातील बातम्या आपण वाचतो. प्रत्येकाचा एक आवाका असतो. ज्ञानासाठी कष्ट करण्याची तयारी असते. त्यामुळे अशी मंडळी एकापेक्षा अधिक पदव्या सहजपणे मिळवतात. सध्याचे जग हे बहुविध ज्ञानाचे बनले आहे. त्यामुळे इंजिनिअरिंगचे विद्यार्थी मराठीतून बी.ए. करण्यालाही प्राधान्य देतात. याचे कारण तंत्रशिक्षणाबरोबर साहित्याचे ज्ञानही त्यांना आवश्यक वाटते. त्यामुळे दिवसेंदिवस दोन पदव्या घेणाऱ्यांचे प्रमाण वाढत चालले होते. याचा फायदा शिक्षण व्यवस्थेलासुद्धा होत होता. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रात त्यामुळे विविध अभ्यासक्रमांसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी प्रवेश घेत असल्याचे चित्र होते.

मात्र, 'यूजीसी'ने यापुढे दोन पदव्या नियमबाह्य असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे साहजिकच सर्वच विद्यापीठांत दोन पदव्या आता घेता येणार नाहीत. याचा परिणाम असा झाला आहे की, सध्या दोन पदव्यांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची दूरशिक्षणकडून फी परत देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. अशा विद्यार्थ्यांना एका पदवीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

या निर्णयामुळे एक विद्यार्थी एकावर्षी एकाच पदवीला प्रवेश घेऊ शकतो. परंतु, संबंधित विद्यार्थी पदवीसोबत पदविका (डिप्लोमा) किंवा सर्टिफिकेट अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. या निर्णयाचा फटका विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राला बसण्याची शक्यता आहे.

# उच्च शिक्षणात ज्ञान रचनावाद निर्मितीची गरज : डॉ. नांदवडेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात कौशल्य विकास व रोजगाराभिमुख ज्ञान रचनावादाच्या निर्मितीची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठात इन्फोसिसच्या सहकार्याने आयोजित फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे उद्‌घाटन डॉ. नांदवडेकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.




रसायनशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास इन्फोसिसच्या सी.एस.आर. व डायव्हिर्सटी इनिशिएटिव्हज व्यवस्थापक रिना रवी आणि ट्रेनर लीना अमृते, जोसेफ आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सृजनशीलता विकास, आऊटकम बेस्ड लर्निंग, कौशल्य विकास व उपयोजित ज्ञान देऊन हातांना काम प्रदान करणाऱ्या शिक्षणाची आणि ते देणाऱ्या शिक्षकांची गरज आहे. केंद्र सरकारने अशा प्रकारचे ३५० हून अधिक विशेष अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. इन्फोसिसच्या रिना रवी यांनी सुधा मूर्ती यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या उपक्रमाचे समाजाच्या तसेच शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व विषद केले. सचिन जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2017
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षांच्या प्रथम सत्रातील तारखेत बदल

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सर्वच विषयांच्या परीक्षा सुरू झाल्या असून, परिक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यातील महाविद्यालयात परीक्षा केंद्रे आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाचे मतदान १७ नोव्हेंबर रोजी होणार असून नियोजित परीक्षा केंद्रांवर मतदान केंद्र असल्याने, या दिवशी संबंधीत परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करणे शक्य नाही. त्यामुळे १७ नोव्हेंबर रोजी होणारे सर्वच विषयाचे पेपर रविवार २६ नोव्हेंबर रोजी नियोजित वेळेत घेण्यात येणार आहेत. याची दखल संबंधीत विद्यार्थी, महाविद्यालय, वरिष्ठ पर्यवेक्षक व परीक्षेचे काम करणारे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी घ्यावी, अशी माहिती पत्रकाव्दारे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली आहे.

**परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांची माहिती**

विद्यापीठातील बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. एड., बी. टेक., एम. पी. एड., लॉ., एम. बी. ए., एम. ए., एम. कॉम., अभियांत्रिकी व बी. फार्मसी या अभ्यासक्रमांचे १७ नोव्हेंबर रोजी होणारे पेपर २६ नोव्हेंबर रोजी होणार आहेत, अशी माहिती महाविद्यालये, शिक्षणसंस्था व सर्व पदव्युत्तर अधिविभागांना विद्यापीठ प्रशासनाकडून कळवण्यात आली आहे. परीक्षेतील बदलासंदर्भात सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची दखल सर्वच घटकांनी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2017
Times of India

# SUK exams on Nov 17 postponed due to polls

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** In the wake of governing body elections on November 17, the Shivaji University, Kolhapur has rescheduled the exam that was going to be conducted on the said date to November 26.

The university authorities said that the exams have been postponed across the division for the easing the elections.

Mahesh Kakade, director, board of examinations and evaluation, SUK, said that due to the elections on November 17, it will be very difficult to conduct the exams in the university premises and hence we have rescheduled the exam to November 26.

**Around 38,000 students were going to appear in exams for 164 subjects**

According to Kakade, exams for BA, BCom, BSc, B Ed, B Tech, MBA, MA, M Com, Engineering and B Pharmacy have been postponed during the rescheduling.

Kakade has asked the concerned authorities to take note of the change and convey it to the students, supervisors and all the teaching and non-teaching faculty members.

Kakade said, "Around 38,000 students were going to appear in exams for 164 subjects."

"There are over 60 question papers of different subjects, which are going to be sent by Secured Remote Paper Delivery (SRPD), while others will be sent manually. The said papers will be delivered manually on November 15. The question papers will be checked for any discrepancy before using them on November 26," he said.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 NOV 2017
Times of India

## 8-day SUK faculty develpoment programme in Mysore

**Kolhapur:** An eight-day faculty development program was inaugurated at Shivaji University, Kolhapur (SUK) in association with Infosys, Mysore on Friday.

According to university officials, experts from the company will offer training to the teaching faculty. As many as 45 faculty members have signed up for the event.


SUK registrar Vilas Nandavadekar said that in primary education several new initiatives have been launched. In the same way higher education also needs outcome and skill based learning to increase employability of students. To reach this end education sector needs such trainers.

He appealed to faculty members to make most of the opportunity and spread knowledge gained through the training to the students. The training will conclude next week. TNN

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 NOV 2017

महाराष्ट्र टाईम्स



संदेश मंडपे, मोबाइल : ८५३०६४०१०८

11 NOV 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**ध्येयवादी दृष्टिकोन, समाजकल्याणाची आणि प्रगतीची तळमळ, माणसावरील अपार श्रद्धा आणि ललितपूर्ण मनोरंजनपर केलेलं विविध विषयांवरच लेखन. या सर्व गोष्टींचं मिश्रण म्हणजे वि. स. खांडेकर. खांडेकरांचे शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनमधील स्मृती संग्रहालय पाहता त्यांचा जीवनप्रवास आपण अगदी थोड्या वेळात जणू त्यांच्याबरोबरच करतोय असं जाणवतं. त्यांनी मांडलेले सगळे विचार आपल्या मनात घोळत राहतात.**



# खांडेकर स्मृती संग्रहालय

## अष्टपैलू साहित्यिकाचा जीवनपट

▶▶ दिग्विजय कोण्णूर, कोल्हापूर

कॉलेज क्लब रिपोर्टर

शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाची स्थापना २००५ साली झाली. या स्मृती संग्रहालयाचा एंट्रन्स खूप 'इंटरेस्टिंग' आहे. खांडेकरांच्या गाजलेल्या पुस्तकांचं सुंदर डिझाइन तयार केलं आहे. संग्रहालयाची रचना खूप चिकित्सकपणे केली आहे. आतील जुन्या घराच्या छताचं डिझाइन सुंदर दिसतं आणि प्रकाशयोजनेचा वापर भेदकपणे केलेला दिसतो. इथे भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यासमोर खांडेकरांचा जणू जीवनपटच उभा राहतो.

खांडेकरांचे अनेक सूक्ष्म पैलू इथे आल्यावर आपल्या लक्षात येतात. खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८९८ साली सांगलीत झाला. त्यांचं प्राथमिक शिक्षण सांगली हायस्कूलमध्ये झालं आणि बी.ए.चं शिक्षण पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये झालं. ते १९२०-१९३८ पर्यंत ट्युटोरिअल इंग्लिश स्कूल, शिरोडा इथे प्राध्यापक होते. १६ जानेवारी १९२९ साली बेळगावच्या मनुताई मणेरीकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. श्रीपाद कोल्हटकर हे त्यांचे लेखन-गुरू. आपणही लिहितं व्हावं असं त्यांना केशवसुतांचा काव्यसंग्रह वाचून वाटले. १९३० साली शिरोडा येथे झालेल्या मिठाच्या सत्याग्रहाचा त्यांच्यावर खोल परिणाम झाल्याचं जाणवून येतं. या संग्रहालयात त्यांच्या बालपणीच्या आठवणी, त्यांचे फोटो, त्यांची संपूर्ण वंशावळसुद्धा रेखीवपणे तयार केली आहे. तिथेच त्यांच्या वापरातील निवडक वस्तू नीटपणे काचेच्या बंद पेटीत ठेवल्या आहेत.

संग्रहालयाचा पुढचा टप्पा हा त्यांच्या करिअरवरती केंद्रित झाला आहे. खांडेकरांचा पहिला लेख 'तुतारी, वाङ्मय व दसरा' हा १९१९ साली 'नवयुग'मध्ये प्रकाशित झाला. खांडेकरांची पहिली कविता 'होळी' हीसुद्धा 'नवयुग'मध्ये १९१९ साली प्रकाशित झाली. 'निकाल द्या' हा त्यांचा पहिला लघुनिबंध प्रकाशित झाला. खांडेकर 'वैनतेय' या साप्ताहिकाचे सहसंपादक होते. 'संगीत रंकांचे राज्य' हे त्यांचे पहिले पुस्तक १९२८ साली प्रकाशित झाले. त्यांनी साहित्याच्या विविध आयामांमध्ये आपली जादू दाखवायला सुरुवात केली. मग यामध्ये सिनेक्षेत्र तर कसे सुटेल? त्यांनी पटकथा, संवाद, आणि गीतलेखन सुरू केले. यात छाया (१९३६), ज्वाला (१९३८), देवता (१९३९), सुखाचा शोध (१९३९), लग्न पाहावे करून (१९४०) आणि बऱ्याच चित्रपटांचा समावेश आहे. त्यांचे पहिले लेख, कविता या सर्व गोष्टींचे फोटो इथे लावले आहेत. पूर्वीच्या काळी सिनेमा सुरू होण्यापूर्वी त्याची माहिती देणारी काही पत्रके असत. याचाही तिथे समावेश केला आहे.

संग्रहालयाच्या त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी दिलेल्या भेटी, त्यांना मिळालेले पुरस्कार त्यांची सर्व पुस्तकं ठेवली आहेत. त्यांनी लेखन करताना वापरलेले काही कच्च्या कामाचे नमुने इथे ठेवले आहेत. त्यांनी जलद लिहिता यावे यासाठी खास 'जर्मन' बनावटीची मागवून घेतलेली पेन्सिलही इथे ठेवली आहे. १९७५च्या साहित्य संमेलनातील भाषणाची ध्वनिफितही इथे उपलब्ध आहे. खांडेकरांना कोल्हापूर, पुणे, सावंतवाडी महापालिकेकडून मानपत्र प्रदान केली आहेत, ती इथे उपलब्ध आहेत. १९६० साली खांडेकरांना 'ययाती' कादंबरीसाठी साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला, तर १९७४ साली याच 'ययाती'साठी ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. त्यांच्या 'ययाती' कादंबरीचे हिंदी, सिंधी, गुजराती, कन्नड, रशियन, फ्रेंच भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. खांडेकर हे १०० हून अधिक पुस्तके अनुवादित झालेले पहिले मराठी लेखक ठरले आहेत.



१४ मे १९७६ रोजी शिवाजी विद्यापीठाकडून त्यांना डिलिट पदवी मिळाली. २ सप्टेंबर १९७६ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्या दिवशीच्या सर्व वृत्तपत्रांच्या स्कॅन कॉपी इथे उपलब्ध आहेत. खांडेकर स्मृती संग्रहालय तयार करण्यामागचे शिवाजी विद्यापीठाचे कष्ट प्रत्येक क्षणाला जाणवतात. खांडेकरांचा जीवनप्रवास आपण अगदी थोड्या वेळात जणू त्यांच्याबरोबरच करतोय असं जाणवतं. त्यांनी मांडलेले विचार आपल्या मनात घोळत राहतात आणि साहित्याच्या प्रत्येक पैलूवर ठसा उमटवणारा हा वि. स. खांडेकरांसारखा 'जादूगार' कोल्हापूरला लाभला म्हणून अभिमानाने ऊर भरून येते.